# निशाण क्र. ४९ वरील आदेश

प्रतिवादी क्र. ३ ने प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचण्यात आले. उभय पक्षकारांच्या विद्वान विधिज्ञांना संधी देवून देखील त्यांनी युक्तिवाद केला नाही.

३. प्रतिवादी क्र. ३ च्या म्हणण्यानुसार वादीने दाव्यात आवश्यक पक्षकार सामील केले नाहीत अशी तक्रार तिने कैफियतीमध्ये पूर्वीच केली आहे, वादीने दाव्यामध्ये निश्चित कोणत्या पक्षकारांना सामील केले नाही, सदर पक्षकारांचे नातेसंबंध याबाबत तपशीलवारपणे कथन तिला करावयाचे आहे. तसेच वादीने मागणी केलेल्या दरम्यानच्या पोटगी संदर्भात देखील प्रस्तूत प्रतिवादीला कथन करावयाचे आहे असे दिसून येते. प्रस्तूत कामी अदयाप मुद्दे निश्चित झाले नाहीत अगर पुरावा देखील सुरु झालेला नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील तरतूदीनुसार अशाप्रकारच्या दुरुस्तीस परवानगी देण्यास कोणतीच अडचण वाटत नाही. सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यास कैफियत अगर दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार नाही. तसेच वादींचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. किंबहुना सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यास वाद विषयाचे अंतिम निवारण होणार आहे असे मला वाटते. सबब या कारणास्तव प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३ ने पुढील तारखेपर्यंत कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Girish Sudarshan Mane
Date: 2019.11.14 15:05:32 +0530

स्थळ : कोरेगाव

दिनांक : १३/११/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव